# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र-२०** **दिनांक - २६/०१/२०२४**

## ऑनलाईन शॉपींग द्वारे फसवणूक झालेली दोन वेगवेगळया प्रकरणातील रक्कम रुपये १,२३,०००/- परत करण्यात सायबर पोलीस ठाणेस यश !!

**प्रकरण ०१** - मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील विरार पोलीस ठाणेचे हद्दीतील देवराजसिंग राणा यांची कार स्पिकर खरेदी करत असताना चुकींच्या लिंकवर क्लिक करुन त्याद्वारे ५०,०००/- रु ची फसवणुक केलेबाबत सायबर पोलीस ठाणे आवक अर्ज क्रमांक ११०७-बी/२०२३ दिनांक ०८/०५/२०२३ अन्वये प्राप्त आहे. नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. **Yes Bank, Easebuzz** यांचेसोबत तात्काळ पत्रव्यवहार करुन व सातत्यपुर्ण पाठपुरावा करुन नमूद फसवणूक रक्कम थांबविण्यात आली व फसवणूक रक्कम ५००००/- रुपये तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आली.

**प्रकरण ०२** - मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील अचोळे पोलीस ठाणेचे हद्दीतील महेश राजाराम जाधव यांची मोरया एजंन्सी कंपनीकरीता आय.व्ही.फ्लड ची आवश्यक्ता होती. सदरबाबत त्यांनी इंडीयामार्टवर शोध घेवून त्यांनी त्यावरुन एका कंपनीसोबत संपर्क साधला असता त्यांना वेगवेगळया कारणांकरीता पैसे भरण्यास सांगून ७३०००/- रु ची फसवणुक केलेबाबत **Cybercrime.gov.in** वर तक्रार नोंदविलेली होती. सदर तक्रारीमध्ये रक्कम अकाऊंटला गोठविण्यात आली. त्याबाबत सायबर पोलीस ठाणे यांनी तात्काळ दखल घेवून संबधित मर्चंडसोबत पत्रव्यवहार व सातत्यपुर्ण पाठपुरावा करुन नमूद फसवणूक रक्कम ७३०००/- रुपये मर्चंडकडून तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आली.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **Online खरेदी करताना मिळालेल्या अनोळखी नंबर अथवा अनोळखी लिंकबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी.**
- **पुर्णतः खात्री झाल्याशिवाय आर्थिक व्यवहार करु नये.**
- **आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती देवू नये.**
- **ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा १९३० या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/ प्रसाद शेनोळकर, मपोहवा/१२१०७ माधूरी धिंडे, पोअं/१२०९२ प्रविण आव्हाड, पोअं/१२०९५ गणेश इलग, मपोअं/ १६१०६ सुवर्णा माळी, मपोअं/१३१०७ पल्लवी निकम, मपोअं/ १३०८७ अमिना पठाण पोअं/२२००३ कुणाल सावळे, पोअं./२२०४० प्रशांत बोरकर यांनी पार पाडली आहे.

सायबर पोलीस ठाणे व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५
सायबर पोलीस ठाणे ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**